**प्रेसनोट** **दि. ३०/०३/२०१९**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन,पुणे.**

**वेश्या व्यवसायातून ३ मुलींची सुटका दोघांना अटक**

दिनांक २१/०३/२०१९ रोजी १४.४५ वा.चे सुमारास व त्यापुर्वी सुकन्या स्पा या नावाचे मसाज सेंटर, कोरेगाव पार्क पुणे येथे इसम नामे १) सागर परदेशी, रा.संत गजानन महाराज नगर, कोंढवा,बुद्र.पुणे २) केवीन सनी, रा भवानी पेठ, पुना कॉलेज जवळ, पुणे यांनी आपसात संगनमत करुन थायलंड देशातील महिलांना थेरपीस्टसाठी नोकरीवर ठेवून त्यांना पैशांचे आमिष दाखवून त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आले., म्हणून त्यांच्या विरूध्द अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद महिलांची सुटका करण्यात आली.

सदर गुन्हयात वर नमूद इसमांना अटक करून त्यांची पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली. सदरची कारवाई ही मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व स्टाफ यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे